follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २४६ * सातारा : रविवार दि. १९ मे २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/


# मोदींच्या तोडफोड नितीला जनता कंटाळली

## मल्लिकार्जून खर्गे यांचा हल्लाबोल




**मुंबई** : नरेंद्र मोदींचे राजकारण विश्वासघाताचे आहे, संविधानाला धाब्यावर बसवून ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स यंत्रणेकडून विरोधकांना धमकी देऊन, आमिषे देऊन पक्ष फोडले व सरकारे पाडली. खऱ्या राजकीय पक्षाचे चिन्ह भाजपाला पाठिंबा देण्याऱ्या पक्षाला दिले, हे सर्व नरेंद्र मोदींच्या इशाऱ्यावरच झाले आहे. नरेंद्र मोदींनी सातत्याने समाजाला तोडण्याची भाषा केली. लोकांना भडकावण्याचे काम केले आहे, मोदींच्या तोडफोड नितीला जनता कंटाळली आहे असा हल्लाबोल काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी केला. हॅटेल ग्रँड हयात येथे इंडिया आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत मल्लीकार्जून खर्गे बोलत होते,

खर्गे पुढे म्हणाले की, देशातली जनता भाजपाच्या कारनाम्यांवर, तोडफोड नितीवर नाराज आहे. भाजपाच्या तोडफोड नितीविरोधात व अत्याचारी कारभाराविरोधात इंडिया आघाडी लढत आहे. देशातील वातावरण इंडिया आघाडीसाठी अनुकूल आहे. इंडिया आघाडीला महाराष्ट्रात ४८ पैकी ४६ जागा मिळतील व देशात सरकार स्थापन करु अशा विश्वास खर्गे यांनी व्यक्त केला आहे.

काँग्रेस पक्षाने ५ न्याय २५ गॅरंटी दिल्या आहेत. ३० लाख सरकारी नोकऱ्या, महालक्ष्मी योजने अंतर्गत गरिब महिलांना दरवर्षी १ लाख रुपये, २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा, शेतीवरचा जीएसटी हटवणार, कर्जमाफी देणार, जीएसटी बदलून नवीन सरळ जीएसटी आणणार ज्याचा एकच दर असणार. युपीए सरकारने आणलेल्या अन्न सुरक्षा कायद्यानुसार गरिब लोकांना महिन्याला १० किलो धान्य मोफत दिले जाईल, असेही खर्गे म्हणाले.

एका प्रश्नाला उत्तर देताना मल्लिकार्जून खर्गे म्हणाले की, काँग्रेस सत्तेत आली तर अयोध्यातील राम मंदिरावर बुलडोझर चालवतील हा मोदींचा आरोप जनतेमध्ये भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. बुलडोझर संस्कृती भाजपाची आहे काँग्रेसची नाही आणि काँग्रेस असे काहीही करणार नाही.

**अन्न सुरक्षा कायदा डॉ. मनमोहनसिंह सरकारचा, नरेंद्र मोदींचा आरोप चुकीचा: शरद पवार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यावेळी म्हणाले की, इंडिया आघाडीचे सरकार आल्यास १० किलो मोफत धान्य देण्याची योजना ही नरेंद्र मोदींच्या योजनेवरून घेतली आहे यात तथ्य नाही. डॉ. मनमोहनसिंह सरकारने अन्न सुरक्षा कायदा आणला व त्या अंतर्गत ही योजना आहे. भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असून गहू उत्पादनात जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

युपीए सरकारनेच ही योजना आणली होती असे पवार यांनी स्पष्ट केले. एका प्रश्नाला उत्तर देताना शरद पवार म्हणाले की, निवडणुकीत सावरकर हा मुद्दा नाही त्यावर राहुल गांधी कशाला काय बोलतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी विनाकारण चिथावणी देण्याचे काम करत आहेत.

या पत्रकार परिषदेला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, शिवसेना खासदार संजय राऊत, मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड, माजी खासदार हुसेन दलवाई, आशिष दुआ, बी. एम. संदीप, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, सचिन सावंत, चरणसिंग सप्रा आदी उपस्थित होते.

## भाजपाला आता आरएसएसचीही गरज नाही, १०० वे वर्ष आरएसएससाठी धोक्याचे : उद्धव ठाकरे

**शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा काही दिवसापूर्वी म्हणाले होते की देशात एकच पक्ष राहिल. आता त्यांनी एका इंग्रजी वर्तमानपत्राला दिलेल्या मुलाखतीत नड्डा म्हणतात भाजप स्वयंपूर्ण झाला आहे आता त्यांना आरएसएसची गरज नाही. म्हणजे ज्यांनी राजकीय जन्म दिला त्या संघाला भाजपा नष्ट करायला निघाला आहे. आरएसएसला १०० वे वर्ष धोक्याचे असून भाजपा आरएसएसलाही नकली संघ म्हणू शकतो, आरएसएसवर बंदीही घालू शकतो असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला आहे. भ्रष्टाचाराचे आरोप करुन बदनाम करायचे व त्यांना पक्षात घेऊन सन्मान करायचा हे काम भाजपा करत आहे. नरेंद्र मोदी यांना अजूनही नवाज शरीफ यांच्या केकची चव आठवत असेल, मनी वसे ते स्वप्नी दिसे अशी त्यांची अवस्था आहे. भाजपाने १० वर्ष महाराष्ट्राला बदनाम केले. मुंबईची लुट करून गुजरातला घेऊन गेले. आता इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर ही लूट थांबवणार आहे. ४ जूनला देशातील जुमलापर्व संपणार असून अच्छे दिन ची सुरुवात होणार आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.**

## पुण्यात महामार्गावर होर्डिंग कोसळलं, दोघे जखमी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे** : सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अचानक आलेल्या जोराच्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. अशातच पुणे सोलापूर महामार्गालगत असणार एक होर्डिंगही कोसळलं. लोणी काळभोर परिसरातील कवडीपाट टोलनाक्याजवळ असलेल्या गुलमोहर लॉन्स येथे आज दुपारी चार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. त्या दुर्घटनेत दोघे जखमी झाले आहेत. तर एका घोड्याला मार लागला.

या दुर्घटनेत भरत साबळे (वय-५७, रा. येरवडा, पुणे) आणि अक्षय कोरवी (वय -२७, रा. पुणे) हे दोघे जखमी झाले आहेत. सोलापूर महामार्गाला लागून असलेल्या गुलमोहर लॉन्स या ठिकाणी एक कार्यक्रम होता. या कार्यक्रमासाठी पुण्यातील बँड पथक त्या ठिकाणी आलं होतं. दरम्यान कार्यक्रम सुरू असताना वाजंत्री वाजवत बसले होते. तर जवळच असणाऱ्या झाडाखाली घोडा बांधला होता.

मुंबई होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर राज्यभरातील होर्डिंग बाबत आवाज उठवला जात आहे. अनधिकृत होर्डिंगचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. मात्र, वारंवार सांगूनही प्रशासन दाद देत नसल्याचेही समोर आलं आहे. अशातच होर्डिंग कोसळल्याची आणखी एक घटना घडल्याने हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, आज सायंकाळी सव्वा चार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे महामार्गालगत असणार आणि धोकादायक रित्या बांधलेलं भल्ले मोठे होर्डिंग कोसळले. या होर्डिंगखाली भरत साबळे व अक्षय कोरवी हे दोघे सापडले. तेव्हा या दोघांना नागरिकांनी तातडीने बाहेर काढले.

# लोकसभा निवडणुकीत भाजपच्या माजी नगरसेवकांनी केलेल्या कामाचा अहवाल देणार

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे** : पुणे लोकसभा निवडणुकीत भाजपच्या माजी नगरसेवकांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. निवडणुकीत दिलेली जबाबदारी नगरसेवकांनी योग्य पद्धतीने पार पाडली की नाही, याचा अहवाल भाजपमधील सुकाणू समिती करणार आहे. हा अहवाल प्रदेशच्या वरिष्ठ नेत्यांना देण्यात येणार आहे. नगरसेवकांनी केलेल्या कामाच्या मूल्यमापनावरच महापालिका निवडणुकतील उमेदवारीबाबतचा विचार होणार आहे. त्यामुळे नगरसेवकांची धाकधूक वाढली आहे. या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या माजी नगरसेवकांनी केलेल्या कामाचा आढावा या अहवालात घेण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांना पुणे महापालिका उमेदवारी द्यायची की नाही, त्यावर विचारमंथन होणार असल्याचे वरिष्ठ सूत्रांनी सांगितले.

पुणे लोकसभेसाठी १३ मे रोजी मतदान झाले. निवडणुकीसाठी भाजपने पुण्याचे उमेदवार म्हणून मुरलीधर मोहोळ यांचे नाव दीड महिने आधीच जाहीर केले होते.

निवडणुकीसाठी एकूण चार उमेदवार रिंगणात असले तरी, मुरलीधर मोहोळ आणि काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यातच लढत झाली. प्रारंभी एकतर्फी वाटणारी ही लढत शेवटच्या टप्प्यात कमालीची चुरशीची ठरली. कसबा पॅटर्नप्रमाणेच धंगेकर यांनी लोकसभा निवडणुकीचा प्रचार केला. धंगेकर आणि मोहोळ या दोघांतच ही निवडणूक झाल्याची कुजबुज सुरू आहे. एमआयएम आणि मनसेची मते या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे.

निवडणुकीच्या प्रचारावेळी भाजपचे काही नगरसेवक काम करत नसल्याच्या तक्रारी सातत्याने काही पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आल्या होत्या. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेले २७ नगरसेवकही नाराज असल्याची चर्चा होती. त्यावरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांनीही नगरसेवकांचे कान टोचले होते. त्यानंतर आता प्रदेश पातळीवरून नगरसेवकांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन होणार आहे.

कोथरूडचे आमदार आणि राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. आगामी विधानसभा आणि पुणे महापालिका निवडणुकीत हा अहवाल महत्वपूर्ण ठरणार आहे.

## सलग तिसऱ्या दिवशी खुनाचा प्रकार

### कोंढव्यात डोक्यात दगड घालून एकाचा खून


**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे** : पुण्यात सलग तिसऱ्या दिवशी खून झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पुणे शहरातील कोंढवा पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका अनोळखी व्यक्तीचा डोक्यात दगड घालून खून करण्यात आला. आज पहाटे ही घटना उघडकीस आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. कोंढवा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

याप्रकरणी अधिक माहिती अशी की, कोंढवा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील संत गाडगेबाबा शाळेसमोर पारशी मैदान ज्योती हॉटेलचौक येथील पारशी मैदानात ही घटना घडली. या मैदानातील बंद बांधकामाच्या ठिकाणी एका अनोळखी इसमास डोक्यात दगड घालून ठार मारण्यात आले आहे. मयत व्यक्तीची ओळख अद्याप पटली नाही.

दरम्यान, मागील तीन दिवसांपासून पुणे शहरात खुनाच्या घटना घडताना दिसत आहेत. शहरातील येरवडा, हडपसर आणि कोथरूड परिसरात या घटना घडल्या आहेत. येरवड्यात मुलांनीच दारूसाठी पैसे न दिल्याने आईचा खून केला. तर हडपसर परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा खून करण्यात आला आहे. तर कोथरूड परिसरात किरकोळ कारणावरून एका बावीस वर्षे तरुणाचा खून करण्यात आला.

## सोळा जीव घेतल्यानंतरही रेल्वेला गांभीर्य नाही



**मुंबई** : रेल्वे परिसर व प्लॅटफॉर्म वर प्रवाशांची सुरक्षा करणे रेल्वेचे आद्य कर्तव्य आहे. मात्र याचा विसर पाडलेल्या रेल्वे प्रशासनाला कशाचे सोयरे सुतक नाही. १६ निष्पाप जीव रेल्वेने घेतले की पालिकेने घेतले की अजून कुणी घेतले यावर सध्या तज्ञ कमिटी तपास करत आहे. १६ जीव गेल्यानंतर रेल्वेने आपल्या हद्दीतील, फालातावरील अनधिकृत प्रकार नेस्तनाबूत करण्याची मोहीम युद्ध पातळीवर राबवायला पाहिजे होती मात्र तसे दिसत नाही.असे मत प्रवासी संघटनेचे अध्यक्ष अमोल मोरे यांनी व्यक्त केले.

रेल्वे स्टेशन तिकीट विंडो जवळ बंद पडलेले आरोग्य केंद्र व त्या बाजूला अनधिकृत फेरीवाले यांच्या मनमानी वास्तव्यामुळे प्रवाशी सुरक्षा धोक्यात आली आहे. रेल्वे प्लॉटफॉर्म वर जे खाद्यपदार्थ स्टॉल आहेत त्यांनी रेल्वे रुळ पासून स्टॉलचे अंतर किती असावे या नियमांचे उल्लंघन केले असून त्यांच्यावर कोणतीही कारवाही रेल्वेने केली नाही. त्या स्टॉल वरील अनधिकृत बांधकाम कोसळून दुर्घटना होऊन प्रवाशी जीव जाऊ शकतात. ब्रिजवर चिंचोळ्या जागेतून ये जा करताना प्रवाशी जखमी होऊ शकतात. रेल्वे ब्रीजवर असणारे फेरीवाले यांनाही अभय दिले जात आहे. भिकारी,गर्दुल्ले, नशा करणारे प्रवाशी, भुरटे चोर, यांच्यावर रेल्वे पोलीस, होमगार्ड, शहर पोलिस, यांचा वचक राहिला नाही.प्रवाशांना धक्काबुक्की करत तृतीयपंथी, चोरटे, गर्दुल्ले बिनबोभाट प्रवास करत आहेत.

अनेक ठिकाणी नूतनीकरण सुरू आहे त्या ठिकाणी कंत्राटदार सुरक्षा पट्टी, रेड मार्किंग, सावध फ्लॅग गार्ड आदी कोणतीही काळजी न घेता मनमानी विकास कामे सुरू आहेत. रेल्वेत झिक झ्याक अवस्थेत असलेले पंखे, टुयब लाईट, गरम होऊन स्पार्क झाले तर आगाची दुर्घटना होऊन प्रवासी जीव धोक्यात येऊ शकतो. अनेक स्थानकात जंबो पंखे बंद अवस्थेत आहेत त्याची देखभाल कंत्राटदार करत नाही.


अनेक ब्रीज वर फेरीवाले जागा अतिक्रमण करून बसले असल्याने गर्दीच्या वेळी चेंगराचेंगरी होऊ शकते.रेल्वे दरवाजे कडी कोयंडा तुटल्याने दरवाजे आदळतात त्याने अपघात होऊ शकतो. या व इतर अनेक प्रकारे रेल्वे सुरक्षा गंभीर आहे.प्रवाशी जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत व फलाटावर उभे आहेत. त्यामुळे रेल्वेने या प्रकरणी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. नाहीतर अजून जीव जातील व सखोल तपास समिती तपास करतच राहील.

# गतवर्षीच्या तुलनेत १५ टक्के साठा कमी

**सोलापूर** : ब्रिटिशकालीन भाटघर धरणात ३३ टक्के, तर निरादेवघर धरणात ३५.८५ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, गतवर्षीच्या तुलनेत १५ टक्के पाणीसाठा कमी आहे. भाटघर धरणातून १९८७ क्युसेकने तर निरादेवघर धरणातून ७५० क्युसेकने पाणी सोडले जात आहे. सध्या दोन्ही धरणांतून २,७४० क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे पुढील काळात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे.

भाटघर धरणाची क्षमता ३४ टीएमसी तसेच निरादेवघर धरणाची क्षमता ११.९१ टीएमसी पाणीसाठा याप्रमाणे आहे. ही दोन्ही धरणे गतवर्षी १०० टक्के भरली होती. मागील वर्षी या कालावधीत भाटघरमध्ये ४२ टक्के तर निरादेवघर धरणात ५५.३५ टक्के पाणीसाठा होता. त्यानुसार यावेळी भाटघर धरणात १० टक्के तर निरादेवघर धराणात १५ टक्के पाणीसाठा कमी आहे. वीर धरणात सध्या ४५.४० टक्के तर गुंजवणी धरणात ४४.२३ टक्के पाणीसाठा असून, गतवर्षी याच कालावधीत वीर धरणात ६३.८८ टक्के तर गुंजवणी धरणात ६०.२७ टक्के पाणीसाठा होता. म्हणजेच गतवर्षीच्या तुलनेत दोन्ही धरणांत १८ टक्के पाणीसाठा कमी आहे.

## कॉसमॉस बँकेच्या उपाध्यक्षपदी सीए यशवंत कासार यांची निवड



**पुणे** : कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँकेचे विद्यमान उपाध्यक्ष श्री. प्रविणकुमार गांधी यांनी नवीन संचालकांना संधी देण्याकरिता उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर सदर रिक्त पदावर, बँकेच्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये, बँकेचे संचालक सीए यषवंत कासार यांची एकमताने निवड करण्यात आली असल्याचे बँकेचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांनी सांगितले.

श्री. यशवंत कासार हे सनदी लेखापाल असून सर्टिफाईड इन्फर्मेषन सिस्टीम ऑडिटर, सर्टिफाईड इन गव्हर्नन्स् ऑफ एंटरप्राईज आयटी, प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रोफेषनल आणि असोसिएषन ऑफ इंटरनॅषनल अकाउंटंटस् लंडन येथील फेलो सदस्य आहेत. सीए कासार इंन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडियाच्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे २०१९.२५ या कालावधीसाठी प्रादेषिक परिशद सदस्य आहेत. कर, कायदे व वित्त क्षेत्रातील तज्ञ आहेत. सन २०१९ पासून कॉसमॉस बँकेचे संचालक म्हणून ते कार्यरत आहेत. चार्टर्ड अकाउंटंट इन को. ऑपरेटीव्ह बँक्स्चे (सीएसीओबी) सीए कासार सचिव आहेत.

तसेच बँकेच्या अंतर्गत सेवक संघटनेने कळविल्यानुसार सेवक प्रतिनिधी पदावर बँकेचे व्यवस्थापक श्री. उदय लेले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# तब्बल दहा लाखांच्या गुटख्यावर कारवाई

### कराड तालुका डीबीची कामगिरी ; वाहतूक करणारा टेम्पो ही पोलिसांनी केला जप्त

**कराड** : घोगाव ता. कराड गावच्या हद्दीत अवैधरित्या गुटख्याची वाहतुक करणाऱ्या टेम्पोसह एकास कराड तालुका गुन्हे प्रकटीकरण शाखेने ताब्यात घेतले. ही कारवाई शनिवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

यामध्ये ९ लाख ६४ हजार ९६० रूपये किमतीची विमल पान मसाल्याची पोती व चार लाख रूपये किमतीचा अशोक लेलंड छोटा हत्ती असा एकूण १३ लाख ६४ हजार ९६० रूपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. समीर बाबासो मुलाणी (वय ३३, रा. लाहोटीनगर, मलकापूर ता. कराड) असे गुटखा वाहतुक प्रकरणी ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, डीवायएसपी अमोल ठाकूर यांनी सातारा जिल्ह्यात अंमली पदार्थ, गुटखा आणि दारूबंदी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या, त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेस गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, घोगाव गावच्या हद्दीतून गुटख्याची वाहतुक होणार आहे. त्या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक सचिन भिलारी, पोलीस हवालदार, सतिश जाधव व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सज्जन जगताप, विनोद माने, सचिन निकम, प्रफुल्ल गाडे, धनंजय कोळी, संदीप पाटील, सनिल माने, नितीन कुचेकर, नाना नारनवर यांनी घोगाव गावच्या हद्दीत सापळा लावला. पोलिसांना मिळालेल्या माहितीप्रमाणे अशोक लेलंड छोटा हत्ती हे वाहन समोरून येताना दिसले.

पोलिसांनी ती गाडी थांबवून चालकाकडे विचारपूस केली असता गाडीमध्ये गुटख्याचा माल घेऊन जात असल्याचे समीर मुलाणी याने सांगितले. पोलिसांनी गाडीत जाऊन पाहिले असता चालकाने पाठीमागील बाजूस कोणास शंका येऊ नये यासाठी तीन कापसाच्या मोठ्या आकाराच्या व पांढऱ्या रंगाच्या गोण्या रचल्याचे दिसून आले. त्याचे मागील बाजूस विमल गुटख्याचा माल व तंबाखू पड्यया भरलेल्या दिसून आल्या.

महाराष्ट्रात गुटखा तसेच तंबाखूजन्य पदार्थाला बंदी असल्याचे सांगून त्याचा चालकाकडे परवाना आहे का विचारले असता चालकाने परवाना नसल्याचे सांगितले. पोलिसांनी गाडीतील ९ लाख ६४ हजार ९६० रूपये किमतीची विमल पान मसाल्याची पोती व चार लाख रूपये किमतीचा अशोक लेलंड छोटा हत्ती असा एकूण १३ लाख ६४ हजार ९६० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक भिलारी करीत आहेत.

# जागतिक वारसास्थळ कास पठारावर फुलला सातारीतुरा

## गतवर्षीच्या तुलनेत एक महिना अगोदर दर्शन

**पेट्री** : जागतिक वारसा हक्काच्या यादीत समावेश असलेल्या कासच्या शिरपेचात सातारीतुरा उमलला आहे. सातारान्सिस हे फूल मे महिन्यात पहिल्या पावसात दर्शन देऊ लागले आहे. गतवर्षी जूनच्या दुसऱ्या आठवड्यात सातारीतुऱ्याचे दर्शन झाले होते.

सातारीतुरा फुलाला शास्त्रीय भाषेत अपोनोजेटॉन सातारान्सिस म्हणूनही ओळखले जाते. दुर्मीळ वनस्पतीपैकी मुळाशी कंद असणारे हे भुई ऑर्किड आहे. पहिला पाऊस झाल्यानंतर सह्याद्रीच्या काही भागात, खडकात, मातीचा भाग व त्यामध्ये पाणी साचते अशा ठिकाणी ही वनस्पती आढळते. जमिनीत छोटा कंद असतो. त्यावर येणारे पान हे लांब व जाडसर आकाराचे असते. भाल्यासारखे दिसते.



पानामध्ये अन्नसाठा भरपूर प्रमाणात साठवत असते. दोन ते तीन पानांच्या बेचक्यातून लांब व जाडसर अशा दांड्यात इंग्रजी 'वाय' आकाराचा तुरा येतो. म्हणून यास वायतुरा म्हणतात. हे फूल केवळ साताऱ्याच्या पश्चिम भागात चार ते पाच ठिकाणीच सड्यावर आढळते. म्हणून यास सातारीतुरा म्हणतात. सातारीतुरा वनस्पतीकास पठारव परिसरातील जैवविविधतेचे भूषण ओळखले जाते. शनिवार, रविवार सुटीत कास तलाव परिसरात पर्यटक मोठ्या संख्येने गर्दी करतानाचे चित्र आहे. दरम्यान सातारीतुरा वनस्पतीचे दर्शनाने आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

### कास पठाराचे वैशिष्ट्य

**जून ते ऑक्टोबर महिन्यांदरम्यान तृण, कंद, वेली, तसेच वृक्ष, झुडपे, आर्किड, डबक्यातील वनस्पतींना अत्यंत आकर्षक निळ्या, जांभळ्या, लाल, रंगाची फुले येतात. मध्य ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात विविधरंगी दुर्मीळ फुलाचे गालिचे आकर्षित करतात**

# संपादकीय

## पराचा कावळा

संभाव्य आजारांची जेव्हा माहिती असते, त्या वेळी संशोधन करून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतात. लस शोधता येतात. क्लिनीकल ट्रायल घेता येतात. दीर्घकाळ त्यांच्या परिणामांचा अभ्यास केला जातो. त्याच्या नोंदी ठेवून निष्कर्ष काढले जातात. कोरोना अचानक आलेला साथीचा विकार होता. त्यामुळे एकूणच जग संभ्रमात होते. लोकांना वाचविणे, त्यांची प्रतिकारशक्ती वाढवण्याला प्राधान्य देणे महत्त्वाचे होते. अमेरिका, ब्रिटन, चीन आणि भारतातच या लसीच्या संशोधनाचे आणि उत्पादनाचे मोठे काम झाले. भारताने तर जगातील अनेक देशांना कोरोनाच्या लसी पुरवल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लसीकरणाच्या मोहिमेला व्यापकत्व दिले. लोकचळवळीचे स्वरुप दिले. १४० कोटींच्या या देशात लसीकरण प्रभावीपणे राबवणे फार अवघड होते. त्यात गैरसमजही अधिक असतात. कोणत्याही लसीची थोडीफार आणि ठराविक लोकांना रिक्शन येत असते. साधे पेनिसिलीन घ्यायचे म्हटले, तरी चाचणी घ्यावी लागते. व्यक्ती तितक्या प्रकृती आणि त्याची प्रतिकारशक्ती असते. सर्वंच लसींचा सर्वंच व्यक्तीवर सारखाच परिणाम होत नसतो. सामान्य लोकांच्या मनातील भीती दूर करणे आवश्यक असते. मोदी यांच्यासह अनेक नेत्यांनी स्वतः कोरोनाची लस टोचून घेतली. त्यामुळे नागरिकांच्या मनात एक विश्वास निर्माण झाला. आता मात्र त्याच विश्वासावर प्रश्नचिन्ह लागले आहे. बिटन आणि भारतातील दोन घटनांमुळे कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सिन या दोन्ही लसींच्या परिणामांबद्दल आलेल्या बातम्यांनी समाजमन भयंकित झाले आहे. लसीकरणामुळे अगोदरच हृदयविकाराचे प्रमाण वाढले आहे, अशा तक्रारी आहेत. आता ब्रिटनच्या न्यायालयात दाखल झालेले प्रकरण, त्याच आधारे सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेली याचिका आणि बनारस विद्यापीठाचा अभ्यास यामुळे लोकांच्या मनात लसींच्या परिणामांविषयी भीतीने घर केले आहे. परिणामापेक्षा भीतीने काही लोक दगावण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत एम्स, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने तसेच तज्ज्ञांनी पुढे येऊन लोकांना आश्वस्त करण्याची गरज आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात दुर्दैवाने ते होत नाही. एकतर पूर्ण ज्ञानी असावे किंवा पूर्ण अडाणी. अर्धवट ज्ञानी लोकच समाजाचे जास्त नुकसान करीत असतात. आता त्याला समाजमाध्यमांची जोड मिळाली आहे. 'कोविशिल्ड' आणि 'कोव्हॅक्सिन'च्या दुष्परिणामांना आरोग्य आणि विज्ञानाची थोडीशी समज असलेल्या 'सोशल मीडिया' प्रभावकांनी आणखी वेग दिला.

ब्रिटनमध्ये स्ट्रोझेनका कंपनीने लसीच्या दुष्परिणामांची कबुली दिली. त्यानंतर भारतातही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली. भारतात 'कोविशिल्ड'चे पुण्याच्या उत्पादन 'सीरम इन्स्टिट्यूट'ने केले, तर 'कोविशिल्ड'चे उत्पादन 'भारत बायोटेक'ने केले. या दोन्ही कंपन्यांना त्या वेळी मोदी यांनी भेट दिली होती. आता 'कोविशिल्ड'च्या दुष्परिणामांची चौकशी करण्यासाठी तज्ज्ञांचे पॅनेल तयार करण्याच्या सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. अधिवक्ता विशाल तिवारी यांनी ही याचिका दाखल केली आहे. लसीकरणानंतर कोणाला इजा झाली, तर त्याची भरपाई करणारी यंत्रणा तयार करावी, अशी मागणी करण्यात आली. भारतातील पहिली कोरोना लस 'कोविशिल्ड'पुण्याच्या 'सीरम इन्स्टिट्यूट'ने ते तयार केली आहे. तिचा फॉर्म्युला ब्रिटिश फार्मा कंपनी 'स्ट्राझेनका' कडून घेतला आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठातील संशोधकांच्या संशोधनाच्या आधारे ही लस बनवण्यात आली होती. 'स्ट्राझेनेका'ने ब्रिटिश न्यायालयात कबूल केले आहे, की त्यांच्या लसीचे गंभीर दुष्परिणाम आहेत. काही प्रकरणांमध्ये, 'थ्रोम्बोसाइटोपेनिया सिंड्रोम' म्हणजेच टीटीएस होऊ शकतो. या आजारामुळे शरीरात रक्ताच्या गुठळ्या तयार होतात आणि प्लेटलेट्सची संख्या कमी होते; परंतु अशी प्रकरणे अपवादात्मक आहेत. जागतिक आरोग्य संघटनेनेही तसेच म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेत 'कोविशिल्ड'च्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठीच्या तज्ज्ञांच्या पथकात 'एम्स'चे तज्ज्ञही असावेत, या समितीचे नेतृत्व 'एम्स'च्या संचालकांनी केले पाहिजे आणि तपासावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांकडे असावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. लस घेतल्यानंतर एखाद्याला गंभीर दुखापत झाली किंवा त्याचा मृत्यू झाला, तर अशा लोकांना भरपाई देण्यासाठी लसीची नुकसान भरपाई प्रणाली तयार करण्याच्या सूचना केंद्र सरकारला देण्यात याव्यात, अशीही मागणी करण्यात आली. पुण्याच्या 'सीरम इन्स्टिट्यूट'च्या 'कोविशिल्ड' लसीच्या दुष्परिणामाचा मुद्दा गाजत असताना आता 'भारत बायोटेक'च्या कोवॅक्सिनचेही दुष्परिणाम असल्याचे पुढे आले आहे. 'स्प्रिंगरलिंक'मध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, बनारस हिंदू विद्यापीठात केलेल्या अभ्यासात सहभागी झालेल्या सुमारे एक हजार लोकांपैकी एक तृतीयांश लोकांमध्ये कोवॅक्सिनचे दुष्परिणाम दिसून आले. किशोरवयीन आणि ज्यांना कोणत्यातरी लर्जीचा त्रास आहे, त्यांना कोवॅक्सिनचा धोका असल्याचे या अभ्यासात म्हटले आहे. 'भारत बायोटेक' या 'कोवॅक्सिन'ची निर्मिती करणाऱ्या कंपनीने त्यांनी बनवलेली लस सुरक्षित असल्याचे काही दिवसांपूर्वी म्हटले होते. मोदी यांनीही 'कोवॅक्सिन'चे दोन डोस घेतले होते.

'कोव्हॅक्सिन' लोकांमध्ये सर्दी, खोकला यासारख्या समस्या दिसून आल्या. अभ्यासात सहभागी झालेल्या किशोरवयीन मुलांमध्ये त्वचा संबंधित रोग (१०.५%), मज्जासंस्थेशी संबंधित विकार (४.७%) आणि सामान्य विकार (१०.२%) आढळून आले. प्रौढांमध्ये सामान्य विकार (८.९%), स्नायू आणि हाडांशी संबंधित विकार (५.८%) आणि मज्जासंस्थेशी संबंधित विकार (५.५%) दिसून आले. ४.६ टक्के किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीतील असामान्यता दिसून आली. डोळ्यांचे विकार (२.७%) आणि हायपोथायरॉईडीझम (०.६%) हे दिसून आले.कोवॅक्सिनच्या दुष्परिणामांवरील अभ्यासात ०.३% सहभागींमध्ये स्ट्रोक आणि ०.१% सहभागींमध्ये गुइलेन बेरी सिंड्रोम (जीबीएस) आढळला. जीबीएस म्हणजे अर्धांगुवायूचा प्रकार. तो शरीराच्या मोठ्या भागांना हळूहळू अक्षम करतो. अभ्यासाचा या निष्कर्षावर काही तज्ज्ञांनी शंका घेतल्या आहेत. त्याचे कारण कोणत्याही लसीचा परिणाम फक्त सहा महिने राहतो आणि आता काढलेले निष्कर्ष किती अचूक असतील, यावरही शंका घेतली जाते.

आणखी एक मुद्दा म्हणजे भारतात एक डोस 'कोविशिल्ड' चा आणि दुसरा 'कोव्हॅक्सिन'चा घेणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. त्यांच्यावर काय दुष्परिणाम झाले किंवा झालेच नाहीत याचा अभ्यास कुणीही केला नाही. 'भारत बायोटेक'ने म्हटले आहे, की 'कोवॅक्सिन'च्या सुरक्षिततेचे देशाच्या आरोग्य मंत्रालयाने मूल्यांकन केले होते.

ही लस तयार केल्यापासून ते प्रशासनापर्यंत त्याच्या सुरक्षिततेवर सतत लक्ष ठेवले जात होते. 'कोवॅक्सिन'च्या संबंधात रक्त गोठणे, थ्रोम्बोसाइटोपेनिया, टीटीएस, व्हीआयटीटी, पेरिकार्डिटिस, मायोकार्डिटिस यासारख्या कोणत्याही रोगाची नोंद झालेली नाही. सध्या देशात निवडणुकीचा हंगाम असल्याने अचानक हा मुद्दा सत्ताधारी आणि विरोधकांमधील राजकीय खेळाचा भाग बनला आहे.

'स्ट्रोझेनका'ने जगभरातील तिची कोविड लस परत मागवण्यास सुरुवात केली; पण थायलंडने काय म्हटले आहे,ते विचारात घेण्याची आवश्यकता आहे. त्या देशात दिलेल्या ४८.७ दशलक्ष डोसमध्ये 'टीटीएस'ची केवळ सात संशयित प्रकरणे आढळली आहेत. त्यांनाही कमी धोका आहे. भारतात चिंतेचे मुख्य कारण म्हणजे देशांतर्गत राजकारण. भारताने जगातील सर्वात मोठी कोरोना लसीकरण मोहीम सुरू केली. ती मोदी यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती केंद्रित होती. आता 'सोशल मीडिया'वर प्रभाव टाकणारे आणि सत्ताधारी पक्षाला घेरणारे विरोधी नेते 'स्ट्राझेनेका' लस वादात उडी घेऊन राजकीय फायदा घेऊ इच्छित आहेत. लसीचे दुष्परिणाम फारच दुर्मिळ आहेत.

# १५ दिवसात ७ बिबट्यांना जेरबंद करण्यात वन विभागाला यश

### बिबट्याविषयी गैरसमज पसरू नये असे वनविभागाचे आवाहन

**नारायणगाव (सा.वा.)** : मागील पंधरा दिवसात जुन्नर तालुक्यातील ओतूर वनपरिक्षेत्र हद्दीमध्ये अवघ्या पंधरा दिवसात सात बिबट्यांना जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले असून बिबट्या विषयी गैरसमज पसरवू नये असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

दिनांक. ०५ मे २०२४ रोजी ओतूर वनपरिक्षेत्रा अंतर्गत लेंडेस्थळ, पिंपळवंडी ता. जुन्नर जि.पुणे येथे प्रियंका मनोज हुलवळे यांचेवर सायंकाळी ०५ वाजता शेतात काम करत असताना बिबटयाने हल्ला केला. यानंतर त्यांना उपचारासाठी विघ्नहर हॉस्पिटल नारायणगाव येथे दाखल करण्यात आले. यानंतर दिनांक. ०८/०५/२०२४ रोजी रुद्र महेश फापाळे रा. काळवाडी ता. जुन्नर जि. पुणे या ८ वर्षाच्या मुलावर सकाळी बिबट्याने हल्ला केला असता त्यात त्याचा मृत्यु झाला तदनंतर दिनांक १०/ मे/२०२४ रोजी श्रीमती नानुबाई सिताराम कडाळे रा. गाजरपट पिंपरी पेंढार हया शेतात काम करत असताना बिबटयाने त्यांचेवर हल्ला केला यामध्ये त्यांचा मृत्यु झाला.

या घटना घडल्या नंतर वनविभागाने हल्ला झालेल्या क्षेत्रामध्ये बिबट जेरबंद करण्यासाठी ४० पिंजरे, २० ट्रॅप कॅमेरे, ड्रोन सर्व्हे व लोकांमध्ये जनजागृती दिवसरात्र करून गस्त सुरू केली. यामध्ये दिनांक. ०८/०५/२०२४ रोजी मौजे लेंडेस्थळ पिंपळवंडी येथे बिबट जेरबंद करण्यात यश आले. त्यानंतर दिनांक.१०/०५/२०२४ रोजी पिंपरी पेंढार येथे ३ बिबट पकडण्यात यश आले. या विभागामध्ये आत्ता पर्यंत आणखी बिबट्या जेरबंद करण्याची कार्यवाही चालु असून आतापर्यंत ७ बिबटे जेरबंद करण्यात यश आले आहे. यामध्ये हल्ला करणारा बिबट जेरबंद करण्यात आला आहे. यानंतर देखील वनविभागाची बिबट जेरबंद करण्याची कार्यवाही चालु राहणार आहे. सदर कार्यवाहीच्या दरम्यान येडगाव येथील सहयाद्री पुलावर वनविभागाने ३ बिबट सोडण्यात आले अशी अफवा पसरवण्यात आली. व एका स्थानीक युट्युब चॅनेल ने त्याला प्रसिध्दी दिली. यामुळे मौजे काळवाडी व पिंपरी पेंढार येथे बिबट हल्ल्यावेळी लोकांच्या मनात सदर हल्ले हे सोडलेल्या बिबटयाने केलेले आहेत असा समज निर्माण झाला.

यामुळे वनविभागावर रोष निर्माण होऊन व गैरसमज निर्माण होऊन आक्रोश दिसुन आला. यामुळे वनकर्मचारी यांना शासकीय कामांत अडथळा व मारहान झाली असुन यामध्ये एक महिला वनरक्षक जखमी झाली आहे.

वनविभागाने सदर नैसर्गिक आपत्ती मध्ये दिवसरात्र काम करुन बिबट जेरबंद करण्याचे काम केलेले असुन सध्या परिस्थीती नियंत्रणात आणन्यात यश मिळाले आहे. तरी या निमित्ताने आवाहन करण्यात येते की, नागरीकांनी चुकीच्या बातम्या व अफवा यावर विश्वास ठेवु नये.

तसेच प्रसार माध्यमानी बातमी प्रसारीत करताना वनविभागाशी खातरजमा करुनच बातमी दयावी. वनविभाग बिबट समस्या सोडविण्यास प्रयत्नशिल असुन नागरीकांनी चुकीच्या बातम्या व अफवा पसरवु नये. नागरिकांनी व माध्यमांनी सहकार्य ठेवावे. असे आवाहन उपवनसंरक्षक अमोल सातपुते वनक्षेत्रपाल वैभव काकडे व नक्षत्र पाल प्रदीप चव्हाण यांनी केले आहे

# लोणी काळभोर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सविता गीताराम लांडगे



**लोणी काळभोर-** पुणे सोलापूर महामार्गावरील पुणे शहरालगत मोठी लोकसंख्या असलेल्या लोणी काळभोर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सविता गीताराम लांडगे यांची बिनविरोध निवड झाली आहे अशी माहीती निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडलाधिकारी अशोक शिंदे यांनी दिली

लोणी काळभोरचे सरपंच योगेश काळभोर यांनी पॅनेल प्रमुखांनी ठरविलेल्या कार्यकाळात राजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी आज लोणी काळभोर ग्रामपंचायतीच्या सभागृहात निवडणूक प्रक्रिया पार पडली, सरपंच पदासाठी सविता लांडगे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्या सरपंच म्हणून बिनविरोध निवडून आल्या यावेळी हवेलीचे जेष्ठ नेते माधव काळभोर,विलास काळभोर,सुभाष काळभोर,शिवदास काळभोर,महाराष्ट्र केसरी राहुल काळभोर,माजी उपसभापती सनी काळभोर,जिल्हा परिषद सदस्या सुनंदा शेलार, आण्णासाहेब काळभोर,उपसरपंच प्रियांका सचिन काळभोर ग्रामपंचायत सदस्य माजी सरपंच राजाराम काळभोर, नागेश काळभोर, भरत काळभोर, गणेश कांबळे,सुनिल गायकवाड, ग्रा.पं. सदस्या, माधुरी काळभोर, ज्योती काळभोर, ललिता काळभोर, रत्नाबाई वाळके,संगीता काळभोर, राहुल दत्तात्रय काळभोर, भारती काळभोर व ग्रामविकास अधिकारी,एस.एन तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# वाढदिवसाचे औचित्य साधत महावीर के रोटी उपक्रमांतर्गत अन्नदान

### मा.श्री.अजित वडगांवकर यांचा ५८ वा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न

**पिंपरी चिंचवड :** श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ राज्य कार्यकारिणी सदस्य अजित वडगांवकर यांचा वाढदिवस दरवर्षी श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, संस्थेच्या सर्व विभागातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या उत्साहात साजरा करत साजरा करत असतात.याही वर्षी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांच्या अभिषेकाने दिवसाची सुरुवात झाली. गुरुवर्य ह.भ.प. डॉ. नारायण म.जाधव यांनी शुभाआशीर्वाद दिले. श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या सभागृहामध्ये कार्यक्रम प्रसंगी श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगांवकर, खजिनदार डॉ. दीपक पाटील, विश्वस्त व ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे, पत्रकार अर्जुन मेदनकर, राजेश नागरे, तुकाराम गवारी,



राजाराम मस्के, अंकुश बोडके, संदेश नवले, चांगदेव वाकडकर, अविनाश पारखी, बाबाजी कुऱ्हाडे,संस्थेचे सभासद अनिल वडगांवकर, शाम पवार, हनुमंत तापकीर,चरित्र समितीचे पदाधिकारी विश्वंभर पाटील सदस्य ज्ञानेश्वर जाधव, धनाजी काळे, चंद्रकांत गोरे,सुखदेव जाधव, सखाराम मुरकुट,सिद्धेश्वर म्हस्के, सर्व विभागातील मुख्याध्यापक,पर्यवेक्षक,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक बहुसंख्येने उपस्थित होते. माऊलींच्या मूर्तीच्या पूजनाने व दीपप्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य दीपक मुंगसे यांनी प्रास्ताविकाद्वारे संस्थेच्या उभारणीमध्ये अजित वडगांवकर यांचा असलेला अनमोल सहभाग व त्यांच्या अंगी असलेले गुण व त्यांचे कार्याविषयी माहिती दिली. प्रशालेतील शिक्षिकांच्या हस्ते अजित भाऊंचे औक्षण करण्यात आले. केक कापून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था,श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समिती, हुतात्मा राजगुरू पत्रकार संघ खेड तालुका, संस्थेचे श्री ज्ञानेश्वर विद्यालय जुनि.कॉलेज,श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यामंदिर, श्री ज्ञानेश्वर बालक मंदिर प्रशालांतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने अजितभाऊ यांचा सन्मान करण्यात आला. संस्था अध्यक्ष सुरेश वडगांवकर यांनी आपल्या मनोगतात त्यांचे सुपुत्र व संस्थेचे सचिव यांच्या आयुष्यातील घटना भावूक होत सांगून आशीर्वाद दिले. खजिनदार दीपक पाटील यांनी मित्रत्वाच्या नात्याने अजित भाऊंचे अंगी असणारे चिकाटी, धैर्य या गुणांची वाखाणणी केली. प्रकाश काळे यांनी अजित या नावाचा अर्थ विशद करत श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचा महाराष्ट्रभर नावलौकिक केल्याबद्दल कौतुक केले.

# भाजपच्या पदाधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आमदार रवींद्र धंगेकर यांच्यानंतर भाजपच्या पदाधिकाऱ्यांवरही सहकारनगर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

राजेंद्र शिळीमकर, सुभाष जगताप यांच्यासह २० ते २५ महायुतीच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आचारसंहिता असतानाही बेकायदेशीर जमाव जमून घोषणाबाजी करुन उल्लंघन केल्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहे. पुण्यात मतदानाच्या आदल्या दिवशी रवींद्र धंगेकर यांनी भाजप पैसे वाटप करत असल्याच्या आरोपाखाली सहकार नगर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले होते.

# आळंदी शहरातील अनधिकृत होर्डिंग्ज काढून घेण्याचे मुख्याधिकारी यांनी दिले आदेश

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** मुंबई येथील होर्डिंग्ज दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. नजिकचा पावसाळा विचारत घेता आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी आळंदी शहरातील सर्व अनधिकृत होर्डिंग्ज तत्काळ निष्कासित करण्याचे व याकामी येणारा खर्च होर्डिंग्ज उभारणारे तसेच ज्यांच्या खाजगी जागेत होर्डिंग्ज असतील त्या मालमत्ता धारकांच्या मालमत्ता करातून वसूल करण्याचे आदेश अतिक्रमण निर्मूलन विभागास दिनांक १४



मे रोजी निर्गमित केले. या आदेशानुसार अतिक्रमण निर्मूलन विभागाने नोटिसा बजावून पुढील कार्यवाही सुरू केली असल्याची माहिती मुख्याधिकारी केंद्रे यांनी दिली.

आळंदी नगरपरिषद कार्यालया मार्फत परवानगी घेवुन उभारण्यात आलेल्या होर्डिंग्ज धारकांना देखील नोटिसा बजावून १५ दिवसाच्या आत रचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) अहवाल सादर करण्याच्या व असा अहवाल विहित मुदतीत सादर न करणाऱ्या होर्डिंग्ज तत्काळ निष्कासित करणे बाबत मुख्याधिकारी केंद्रे यांनी अतिक्रमण निर्मूलन विभागास सूचना केल्या आहेत.आळंदी नगरपरिषद मालकीच्या शॉपिंग सेंटर येथील ३ व चाकण चौक येथील १ अश्या ४ होर्डिंग्ज देखील काढून घेण्याच्या सूचना मुख्याधिकारी यांनी केल्या आहेत.

आळंदी नगरपरिषद अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या अनधिकृत होर्डिंग्ज निष्कासित करण्याच्या कारवाईत अडथळा निर्माण करणाऱ्यांवर शासकीय कामात अडथळा निर्माण केले बाबत कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

तसेच, अनधिकृत होर्डिंग्ज निष्कासित करण्याची कारवाई पूर्ण होई पर्यंतच्या काळात एखादी होर्डिंग्ज कोसळून दुर्घटना घडल्यास संबंधित होर्डिंग्ज धारक तसेच ज्यांच्या खाजगी जागेत अशी होर्डिंग्ज असेल ते जागा मालकावर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांनी दिला आहे.

# पुणे महापालिका निवडणूक कधी?

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** तब्बल २ वर्षांपासून जास्त कालावधी होऊन पुणे महापालिकेवर प्रशासकीय राज सुरू आहे. त्यामुळे माजी नगरसेवकांना कामे करण्यात अडचणी येत आहे. सर्वच अधिकार आयुक्त आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

पुणे महापालिका निवडणूक तातडीने व्हावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. २०१७ मध्ये महापालिका निवडणूक झाली होती. त्यानंतर ही निवडणूक प्रक्रीया रखडली आहे. २०२२ मध्ये पुणे महापालिका निवडणूक अपेक्षित होते. मात्र, २ वर्षांपेक्षा जास्त कालावधी लोटूनही ही निवडणूक घेण्यास टाळाटाळ केली जात आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी पुणे महापालिका निवडणूक होणार असल्याचे सांगण्यात येत होते. तशी तयारीही प्रशासकीय यंत्रणेने केली होती. माजी नगरसेवक आणि इच्छुक उमेदवारांनी प्रभागात जनसंपर्क वाढवायला प्राधान्य दिले होते. आता विधानसभा निवडणुकी नंतर पुणे महापालिकेची निवडणूक होणार असल्याची कुजबुज सुरू आहे.

नगरसेवक नसल्याने प्रभागात कामे करण्यास अडचणी येत आहेत. तशा प्रकारची ओरड होत आहे.

# आपत्कालीन परिस्थितीत सर्व यंत्रणांनी आपसात शंभर टक्के समन्वय ठेवावा : विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपत्तीपूर्व व आपत्ती काळात आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी. तसेच आपत्कालीन परिस्थितीत सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेऊन काम करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या.

विधान भवन येथे आयोजित पुणे विभागस्तरीय मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पुणे महानगरपालिका आयुक्त राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपायुक्त रामचंद्र शिंदे आदी उपस्थित होते. सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, कोल्हापूर जिल्हाधिकारी अमोल येडगे, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



यावर्षी हवामान विभागाने सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज व्यक्त केला असल्याचे सांगून डॉ. पुलकुंडवार म्हणाले, त्यामुळे सर्व विभागांनी कोण्यात्याही आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सर्व तयारीनिशी सज्ज असले पाहिजे. आत्पकालीन परिस्थितीत विभाग प्रमुखांनी, समन्वयाची जबाबदारी असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये. सर्व विभागांनी आपले नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावेत. त्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकांची देवाणघेवाण करावी.

पुलकुंडवार म्हणाले, अतिवृष्टीमुळे अलमट्टी धरणात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग वाढल्याने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात पूरपरिस्थिती निर्माण होते. त्यामुळे पूरनियंत्रणासाठी पाटबंधारे विभागाने आंतरराज्यीय समन्वय राखावा. पाटबंधारे विभागाने धरणातील पाण्याची पातळी लक्षात घेऊन पाणी सोडण्याचे नियोजन करावे, पाण्याचा विसर्ग वाढविण्यापूर्वी पुरेशी पूर्वसूचना द्यावी. धरणभिंती, कालवे संरचनांची तपासणी करुन कुठे गळती असल्यास दुरुस्ती करावी.

पूरप्रवण व दरडग्रस्त क्षेत्रात स्थानिक यंत्रणांनी विशेष खबरदारी घ्यावी, धोकादायक पुलांचे संरचनात्मक अंकेक्षण करावे, जलजन्य आजार पसरु नयेत यासाठी आरोग्य विभागाने सतर्क राहून काम करावे, पशुसंवर्धन विभागाने पशुंचे मान्सूनपूर्व लसीकरण करुन घ्यावे. पशुहानी झाल्यास मृत पशुंची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करावी. आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक असणारी यंत्रसामुग्री तसेच पर्जन्यमापक यंत्रे सुस्थितीत ठेवावीत असे सांगून स्थानिक यंत्रणांनी आपत्तकालीन परिस्थितीची माहिती तातडीने वरिष्ठांना कळवावी अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

पुलकुंडवार म्हणाले, शहरातील नालेसफाईची कामे तातडीने पूर्ण करावीत. अवैध जाहिरात फलक हटविण्यासह मान्यता असलेल्या जाहिरात फलकांची संरचनात्मक स्थीरता तपासून धोकादायक फलक हटविण्यात यावेत. धोकादायक वाड्यांतील नागरिकांचे स्थलांतर करण्यात यावे. नाले, नदीपात्राच्या कडेची अतिक्रमणे काढण्यात यावीत. तेथील नागरिकांना तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये स्थलांतरीत करण्यात यावे.

शहरातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम प्राधान्याने करावे, पूरपरिस्थितीनंतर नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करुन द्यावे तसेच पहिल्या पावसानंतर शहरात साठलेला राडारोडा तातडीने हटविण्याची व्यवस्था करावी अशा सूचना महानगरपालिका आयुक्तांना दिल्या. तसेच ग्रामीण भागातील अनधिकृत जाहिरात फलकही हटविण्यात यावेत. महावितरणने विजेचे खांब, तारा यांची तपासणी करुन आवश्यक ती दुरुस्ती करावी. कृषी विभागाने अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानभरपाईचे प्रस्ताव पाठवावेत, त्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असेही डॉ. पुलकुंडवार म्हणाले.

यावेळी सुनील फुलारी यांनी पोलीस विभागाच्या तयारीची माहिती दिली तसेच सर्व जिल्ह्यात आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी ठरु शकतील अशा पोहणाऱ्या व्यक्तींची यादी करण्यात आली आहे. महसूल, ग्रामविकास आणि पोलीस विभागाने समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

बैठकीत महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

## भरधाव टेम्पोच्या धडकेत दुचाकी स्वाराचा मृत्यू



**कोल्हापूर :** भरधाव टेम्पोची धडक बसल्याने दुचाकी स्वराचा मृत्यू झाला. भाऊसो पाटील (वय ४३ रा.पाडळी खुर्द ता. करवीर ) असे मयत इसमाचे नाव असून हा अपघात सकाळी पाडळी खुर्द गावातील आंबेडकर चौकात झाला अपघाताची नोंद करवीर पोलीस ठाण्यात झाली आहे.

घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार भाऊसो पाटील हे कोल्हापुरातील मार्केट यार्ड इथल्या व्यापाऱ्याकडे कामाला आहेत. नेहमीप्रमाणे शनिवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ते कामासाठी दुचाकीवरून निघाले होते. पाडळी खुर्द गावातील आंबेडकर चौकात आले असता, समोरून भरधाव वेगान आलेल्या टेम्पोची त्यांच्या दुचाकीला जोराची धडक बसली. या अपघातात भाऊसो पाटील हे दूर फेकले गेल्याने रस्त्यावर आपटून त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाली. प्रचंड रक्तस्राव झाल्यान ते बेशुद्ध झाले. गंभीर जखमी अवस्थेत गावातील रुग्णवाहिकेतून अमर पालकर, इंद्रजीत पाटील, अनिल कदम यांनी त्यांना सीपीआरमध्ये दाखल केलं. पण उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचं वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलं. भाऊसो पाटील यांचा अपघात झाल्याच समजताच ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी सीपीआरमध्ये गर्दी केली होती. दरम्यान करवीचे माजी आमदार चंद्रदीप नरके यांनी सीपीआर मध्ये येऊन नातेवाईकांची भेट घेतली. या अपघाताची नोंद करवीर पोलिसात झाली आहे

# वरंधा घाट पुन्हा वाहतुकीस बंद

## रस्ता बंदचे सुचना फलक लावण्याची गरज






**भोर :** भोर महाड मार्गावरील वरंध घाट १ एप्रिल ते ३० मे पर्यंत दुरुस्तीच्या कामासाठी रायगड प्रशासनाने बंद केला आहे.परंतू निवडणूक, लग्नसराई, उन्हाळ्याची सुट्ट्यांमुळे कोकणात ये- जा करणार्या प्रवास्यांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रवाशांनी केलेल्या मागणी वरून महाडचे आमदार भरत गोगावले यांच्या पुढाकाराने एक मे पासून काही दिवसांकरीता हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पुन्हा खुला करण्यात आला होता. मात्र वरंध घाटातील दुरुस्तीचे काम शुक्रवार (ता.१७) पासून पुन्हा सुरु करण्यात आले असल्याने एक मे पासून सुरु करण्यात आलेला रस्ता बंद करण्यात आला आहे. त्यामुळे भोरमार्गे महाडला जाणाऱ्या वरंध घाट मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक ३० मे पर्यंत बंद करण्यात आली आहे.

वरंध घाटातील रायगड जिल्ह्याच्या हद्दीतील २१ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची कामे करण्यात येत आहे. त्यातील पारमाची ते भोर रायगड हद्दीतील दुरुस्ती व संरक्षण भिंत बाधणे आदी कामे ३० मे पर्यंत सुरु राहणार आहेत. वरंधा घाटात ही कामे सुरु असताना अपघात होण्याची शक्यता असल्याने सुरक्षतेसाठी रस्ता बंद करण्यात आला आहे.

### रस्ता बंदचे सुचना फलक लावण्याची गरज

**भोर - महाड मार्गावरुन वरंध घाट बंद असल्याचे भोर च्या सार्वजनिक बांधकाम विभागाने अजून या रस्त्यावर सुचना फलक लावलेले दिसत नाहीत. यामुळे प्रवाशांची वरंध घाटात जाऊन परत घाटातून भोरला येण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे कापुरहोळ, शिंदेवाडी व भोर येथे रस्ता बंद बाबत सुचना फलक लावणे गरजेचे आहे.**

भोर महाड हद्दीवर वरंधा घाटातील कावळा गडाजवळ रस्त्यावर मोठे मोठे दगड टाकून रस्ता बंद केला आहे.

## उद्धव ठाकरे मानसिक आजारी आहेत : चंद्रशेखर बावनकुळे



**नाशिक :** उद्धव ठाकरे यांना पराभव दिसू लागल्याने त्यांचे मानसिक संतुलन ढासळले आहे. ते चिडलेले आहेत, घाबरलेले आहेत. त्यामुळे ते काहीही बडबड करीत आहेत. अन्यथा भगव्या ध्वजाबाबत त्यांनी असे उद्गार काढले नसते, असा टोला भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ठाकरे यांना लगावला. नाशिक येथे आयोजित पदाधिकारी मेळाव्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, चोरांचे सरदार कोण आहेत हे संपूर्ण राज्याने पाहिले आहे.

राज्यासह मुंबई मनपा लुटण्याचा प्रकार ठाकरे यांनी केल्याचे सगळ्यांना ज्ञात आहे. शिंदे-फडणवीस सरकारमुळे विकास झाला. मात्र, ठाकरे यांना तो दिसत नाही. उद्धव यांनी हिंदुत्व सोडले नसते, काँग्रेस सोबत गेले नसते तर ते फस्ट्रेट झाले नसते. भगव्या ध्वजाबाबत त्यांनी काढलेले उद्गार त्यांच्या पराभूत मानसिकतेचे द्योतक असल्याचेही ते म्हणाले. ठाकरे आडनावाला वलय आहे.

परंतु राज ठाकरे यांना बाहेर काढण्यात आले. उद्धव यांनीच त्यांना बाजूला केले. राज ठाकरे यांनी भाजपला समर्थन देण्याचा निर्णय योग्य आहे. पंतप्रधान मोदी राज यांच्या मागण्या नक्कीच पूर्ण करतील, असा आम्हाला विश्वास आहे. शरद पवार यांच्याबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, पवारांचा पक्ष बारामतीतही हरतो आहे. त्यामुळे त्यांना उतारवयात गल्लोगल्ली फिरावे लागते आहे, असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला.

## खुलेआम तीन पानी जुगार ; कारवाई होणार का ?

**शिरोळ :** शिरोळ पोलीस ठाण्याच्या अगदी हाकेच्या अंतरावर तसेच नृसिंहवाडी व अर्जुनवाडरोड लगत असणाऱ्या पत्र्याच्या खोलीत तीन पाणी जुगार मोठ्या प्रमाणात सूर असून शिरोळ पोलिसांच्या दुर्लक्षामुळे हे अवैध व्यवसाय मोठ्या जोमाने सुरू आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय सुरू असताना देखील शिरोळ पोलीस ठाणे कारवाई का करत नाही ? असा सवाल शिरोळ शहरातील सर्व सामान्य नागरिकांतून विचारला जात आहे.

शिरोळ हे तालुक्याचे ठिकाण असल्याने दररोज तालुक्यातील अनेक ग्रामस्थ या ना त्या कामासाठी शिरोळ शहरात दाखल होतात. याचाच फायदा अवैध व्यवसायिकांनी घेतला असून मटका, जुगार आणि अवैध दारूची विक्री शहरात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. पोलिसांनी मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने या अवैध व्यवसायावर वचक कोण बसवणार ? हा प्रश्न उपस्थित होत आहे. शिरोळ शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. आणि या ऐतिहासिक शहरात चळवळही रुजली गेली आहे. त्यामुळे शिरोळला मोठे महत्त्व आहे. असे असताना शिरोळ शहरात अवैध्य व्यवसाय मोठ्या प्रमाणात फोफावले आहेत.

शहरातील दत्तनगर भागात खुलेआम दारू विक्री सुरू आहे. तर पोलीस ठाण्याच्या समोर अवघ्या अर्धा ते एक किलोमीटर अंतरावर तीन पाणी जुगाराचा खेळ मोठ्या प्रमाणात खेळला जात आहे. . यावर पोलीस कारवाई करणार का ? असा सवाल उपस्थित होत आहे.

## नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी सज्ज रहावे : तहसीलदार अनंत गुरव

### पंचायत समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित आपत्ती व्यवस्थापन बैठक

**पाटण :-** नैसर्गिक आपत्ती तालुक्याला नवीन नाही,तालुक्यातील जनतेच्या ती अंगवळणी पडली आहे. मात्र प्रशासनाला तसे करून चालत नाही. यासाठी खातेप्रमुखांसह, गावपातळीवरील कोतवाल, शिपाई यांच्यापर्यंत सर्व कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून संभाव्य नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी सज्ज रहावे असे आवाहन येथील तहसीलदार अनंत गुरव यांनी केले.

येथील पंचायत समितीच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित आपत्ती व्यवस्थापन बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी गटविकास अधिकारी गोरख शेलार, सार्वजनिक बांधकाम उप अभियंता विभाग संजय शिंदे, जिल्हा परिषद बांधकाम उप अभियंता राजेंद्र चव्हाण, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी राजश्री बने, पोलिस निरीक्षक अविनाश कवठेकर, पोलिस उपनिरीक्षक संदीप शितोळे, सहाय्यक गटविकास अधिकारी राजाराम लोखंडे, तालुका कृषी अधिकारी कुंडलीक माळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**आपत्ती व्यवस्थापन बैठकीत मार्गदर्शन करताना तहसीलदार अनंत गुरव व विविध विभागांचे प्रमुख व कर्मचारी.**

यावेळी तहसीलदार अनंत गुरव यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी माहितीचे आदानप्रदान करून संभाव्य धोके टाळावेत असे ही स्पष्ट करून धरणातून पाणी सोडल्याने झळ बसणारी गावे, धोकादायक गावांच्या निवारा शेड मधील व्यवस्था तसेच आरोग्य विभागाने आवश्यक औषधांचा साठा करून ठेवणे, सर्पदंश, कुत्रा चावल्यानंतर देण्यात येणारी लस याबाबत दक्ष राहण्याचे आवाहन केले.

अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करण्यात यावी, अधिकृत होर्डिंग्ज स्ट्रक्चरल ऑडिट करणे, तालुक्यातील रस्त्याशेजारी असणारे खड्डे मुजविणे, पर्यटन केंद्रांवर खबरदारी म्हणून पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात यावा तसेच घाटातील रस्त्यांची डागडुजी करून घेणे यासह अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली.


# यंदा खरिपाच्या क्षेत्रात १५ टक्के वाढ प्रस्तावित

## कृषी विभागाकडून खते, बियाणांचे नियोजन

**अहमदनगर :** सध्या कमी-अधिक पडणारा अवकाळी पाऊस व यंदा हवामान खात्याने समाधानकारक पावसाचा वर्तवलेला अंदाज लक्षात घेता कृषी विभागाने खरिपाचे नियोजन केले आहे. यंदा खरिपाच्या क्षेत्रात मागील वर्षीपेक्षा १५ टक्के वाढ अपेक्षित असून, ७ लाख हेक्टर क्षेत्र खरिपासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. यात सोयाबीनचा पेरा दुपटीने वाढण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने कृषी विभागाने बियाणे व खते मुबलक उपलब्ध होतील, याची खबरदारी घेतली आहे.

जिल्ह्यात १५ जून ते १५ ऑगस्ट हा खरीप हंगाम पेरणीचा कालावधी असून जिल्ह्याच्या भौगोलिक रचना आणि होणाऱ्या पर्जन्यमानानुसार खरीप हंगामातील पिकांची निवड झालेली आहे. यात दक्षिण जिल्ह्यात प्रामुख्याने कडधान्य पिके घेतली जातात. तर उत्तरेतील अकोले आणि पारनेर तालुका वगळता उर्वरित सर्व तालुक्यांत नगदी पीक म्हणून सोयाबीन, कपाशीचे पीक घेण्यात येते. नगर जिल्हा हा प्रामुख्याने रब्बी हंगामाचा जिल्हा आहे.

मात्र, अलीकडच्या काही वर्षांत जिल्ह्यात खरिपाच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ झालेली आहे.खरीप हंगामात कपाशी आणि सोयाबीन पिकाचे क्षेत्र वाढत असून, या दोन पिकांमुळे



कमी कालावधीत शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होतो. याशिवाय भात, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद या पिकांनाही शेतकरी पसंती देतात.जिल्ह्यात सरासरी ५ लाख हेक्टरवर खरिपाच्या पेरण्या होतात. मात्र, गेल्या तीन वर्षांत त्यात वाढ होत आहे. मागील वर्षी ५ लाख ८६ हजार हेक्टरवर खरिपाची लागवड झाली होती. यंदा त्यात १५ ते १७ टक्के वाढ होऊन ७ लाख २ हजार हेक्टरवर खरिपाच्या लागवडीची शक्यता आहे. त्यामुळे बियाणे व खतांचीही आगाऊ मागणी करण्यात आली आहे.

### दीड लाख टन खत शिल्लक

**सन २०२४ च्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाने एकूण २ लाख ८० हजार टन खताची मागणी शासनाकडे केली. त्यातील २ लाख ३२ हजार आवंटन मंजूर झाले आहे. दरम्यान, यात मागील वर्षीची शिल्लक १ लाख २४ हजार ७२५ टन आहे. १ एप्रिलपर्यंत २० हजार ९०० टन खत प्राप्त झाले. आतापर्यंत त्यातून ४ हजार ५२६ टन खतांची विक्री झाली. त्यामुळे सध्या १ लाख ४७ हजार ५७२ टन खते उपलब्ध आहेत. तर उर्वरित खते मागणीनुसार उपलब्ध होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून मिळाली.**

### सोयाबीन बियाणाची अधिकची मागणी

पेरा वाढणार असल्याने कृषी विभागाने यंदा बियाणांची अधिकची मागणी नोंदवली आहे. यंदा खरिपासाठी ८२ हजार ८४९ क्विंटल बियाणांची मागणी करण्यात आली असून यात ४९ हजार ८७५ क्विंटल बियाणे सोयाबीनचे आहे. त्याखालोखाल मक्याचे १३ हजार २००, भाताचे ५ हजार ५४०, बाजरीचे २९७५, तर कपाशीचे बियाणे अडीच हजार क्विंटल असेल.



**फित कापून फलटण अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय उद्घाटन करताना मुबई उच्च न्यायालयातील न्या. प्रकाश नाईक, शेजारी जिल्हा व सत्र न्यायाधीश न्या. विनायक जोशी व मान्यवर,**

## शिरटीकरांना मिळणार शुद्ध आणि मुबलक पाणी

### गावात कोट्यावधी रुपयाचे विकास काम पूर्ण : राहुल सूर्यवंशी

**शिरोळ :** शिरोळ तालुक्यातील शिरटी ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून जल जीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर करून घेतली या योजनेच्या माध्यमातून आता ग्रामस्थांना स्वच्छ आणि मुबलक पाणी मिळत आहे तसेच गावात कोट्यावधी रुपयाची विकास कामे पूर्ण करण्यात आली आहेत तर गावचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी अनेक कामे प्रस्तावित आहेत अशी माहिती माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य राहुल सूर्यवंशी व विद्यमान सरपंच हसीना मुल्लानी यांनी पत्रकार बैठकीत दिली.

यावेळी पत्रकार बैठकीत बोलताना राहुल सूर्यवंशी म्हणाले की, गेले वीस वर्षे शिरटीकरांना प्राणी प्रश्न भेडसावत होता यासाठी सातत्याने पाठपुरावा करून पाणीपुरवठा योजना मंजूर करून आणली या योजनेचे काम पूर्णत्वास आले यामुळे गावात शुद्ध पाणीपुरवठा सुरळीत सुरू आहे त्यामुळे ग्रामस्थांच्यातून समाधान व्यक्त होत आहे तसेच गावच्या विकासासाठी प्रसंगी रास्ता रोको सारखे आंदोलन करून विकास कामे मार्गी लावले यामुळे शिरोळ घालवाड फाटा ते महावीर नगर ते शिरटी पर्यंतच्या रस्त्याच्या कामास मुख्यमंत्री सडक योजनेतून निधी मंजूर करून आणण्यात आला त्या रस्त्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे गेले अनेक वर्षे रखडलेला रस्ता लवकरच पूर्णत्वास येणार आहे

शिरटी गावाचा विकास साधत असताना शासनाच्या विविध योजनेतून माजी खासदार राजू शेट्टी माजी आमदार उल्हास पाटील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सहकारमहर्षी गणपतराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली निधी उपलब्ध करून अनेक विकास कामे पूर्ण करण्यात आली आहेत यामध्ये प्रामुख्याने पूर्व गावठाणमधील गटर्स व सांडपाणी नियोजन करण्यासाठी २५-१५ योजनेतून मंत्री गिरीश महाजन यांच्याकडून माजी खासदार राजू शेट्टी यांच्या विशेष प्रत्नातून १५ लाख रुपये मंजर झालेत, व उर्वरित निधीसाठी प्रयत्न सुरू आहेत

महावीर नगर मधील रस्ते व गटर्स करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुरू आहे मुख्य चौकामध्ये गाव चावडी कार्यालय येथे ग्रामपंचायत कार्यालय एकत्र बांधणे व चौकातील व्यावसायिक यांना गाळे भाड्याने देण्यात येणार आहेत. गावातील नळ कनेक्शनला मीटर बसविणे गावातील संपूर्ण सांडपाण्यासाठी स्वच्छता प्रकल्प राबविणे पर्यटन विकास निधीमधून नदीकाठी घाट बांधणे व दंडवत रस्ता करणे गावातील पूर्ण अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे पूर्व गावठाणमधील अंतर्गत गटर्स करणे गावातील सर्व रस्ते करणेसाठीं निधीची मागणी करण्यात आली आहे समाज कल्याण विभागामधून मंत्री धनंजय मुंडे यांच्या फडातून माजी खासदार राजू शेट्टी यांच्या विशेष प्रयत्नातून रस्ता करण्यासाठी १५ लाख मंजूर झाले जि.प. सदस्य दानोळी सौ. शुभांगी शिंदे यांच्या फंडातून महावीर नगर येथील शांतीसागर मराठी शाळा दुरुस्तीसाठी ४ लाख मंजूर करून शाळेची दुरुस्ती करण्यात आली

जि.प. सदस्य पद्माराणी पाटील यांच्या फंडातून साडेआठ लाख रुपये निधी मंजूर करून नवीन अंगणवाडी बांधण्यात आली शिरटी घालवाड रस्ता होणेसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. मंत्री दीपक केसरकर यांना भेटून निवेदन दिले त्या अनुषंगाने मुख्यमन्त्री सडक योजनेतून ५ कोटी ३१ लाख रुपयेचे काम सुरु आहे. व काम लवकर पूर्ण होणेसाठी प्रयत्न करणार आहे.

## भारतीय लोकशाही संकल्पना टिकविण्यासाठी युवा वर्गाने पुढे यावे

### दत्ता देसाई : कॉम्रेड गोविंद पानसरे युवा जागर प्रबोधन शिबिर

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** भारतीय जनतेच्या शेकडो वर्षांच्या संघर्षातून भारतीय लोकशाहीची संकल्पना साकारली गेली आहे.पण भारतीय संविधानातील लोकशाही,धर्मनिरपेक्षता,विविधतेत एकता अशा विविध तत्वांना छेद देण्याचा प्रयत्न प्रतिगामी शक्तींकडून होत आहे. अशावेळी भारतीय लोकशाहीची संकल्पना टिकविण्यासाठी युवा वर्गाने पुढे यावे असे आवाहन ज्येष्ठ अभ्यासक व लेखक दत्ता देसाई यांनी केले. पन्हाळा येथे श्रमिक प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कॉम्रेड गोविंद पानसरे युवा जागर शिबिरात'भारताची कल्पना व माझ्या स्वप्नातला भारत'या विषयावर ते बोलत होते.

पुढे बोलताना देसाई म्हणाले,प्रतिगामी विचारांच्या प्रवृत्ती आपले विषमतावादी तत्त्वज्ञान भारतावर लादू पाहत आहेत.या



**कॉम्रेड गोविंद पानसरे युवा जागर प्रबोधन शिबिरात बोलताना ज्येष्ठ अभ्यासक दत्ता देसाई.**

पार्श्वभूमीवर २०२४ ची लोकसभेची निवडणूक भारतात अंत्यत महत्वाची समजली जात आहे.देशभरात लोकांमध्ये नवजागृतीची मोहीम उभारण्याची गरज आहे.भारतातील शेतकरी, शेतमजूर, कामगार, महिला, युवक, पारलिंगी समूह अशा सर्व शोषित समाजातील लोकांच्या आकांक्षा पूर्ण करणारे नवभारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी व नवा मानवी समाज घडविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करायला हवेत.

या शिबिरात'इतिहासाचा वेध'या विषयावर प्राचार्य डॉ.आनंद मेणसे,शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ.अवनिश पाटील, इतिहास संशोधिका डॉ.मंजुश्री पवार यांनी,'धर्म,जात आणि संस्कृती'या विषयावर नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील प्रा.डॉ.दिलीप चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.तसेच सायंकाळच्या सत्रात सुप्रसिद्ध आर.जे.संग्राम खोपडे यांनी शिबिरार्थींशी संवाद साधला.

तसेच अभिनेत्री प्रतीक्षा खासनीस हिने'कडेकोट कडेलोट' नाट्यप्रयोगाचे सादरीकरण केले.तर शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख प्रा.डॉ.मेघा पानसरे यांनी प्रास्तविकात शिबिराच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली.कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.नंदकुमार मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सुशील लाड यांनी स्वागत केले.कबीर पानसरे यांनी सूत्रसंचालन केले.प्रा.अभय गायकवाड यांनी आभार मानले.

## क्राईम

### बसस्थानक परिसरातून युवती बेपत्ता

**सातारा :** सातारा बसस्थानक परिसरातून एक युवती बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास सातारा बसस्थानक येथून पाटण तालुक्यातील एक युवती बेपत्ता झाली आहे. अधिक तपास सहाय्यक फौजदार पवार करीत आहेत.

### गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सातारा :** गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची नोंद शाहूपुरी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १५ रोजी १२ वाजण्याच्या पूर्वी शिवाजी लक्ष्मण शिर्के मूळ रा. चिखली, पोस्ट ठोसेघर, ता. सातारा सध्या रा. ढोणे कॉलनी, सातारा यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे .अधिक तपास पोलीस हवालदार डमकले करीत आहेत.

### वेण्णा लेक परिसरातून सुमारे पाच लाखांच्या दागिन्यांची चोरी

**सातारा :** वेण्णा लेक परिसरातून अज्ञात चोरट्याने सुमारे पाच लाखांच्या दागिन्यांची चोरी केल्याची फिर्याद महाबळेश्वर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी शिवाजी गणपत रावत रा. बाणेर, पुणे हे महाबळेश्वर परिसरातील वेण्णा लेक येथे फिरावयास आले होते. परिसरात गाडी पार्क करून ते वेण्णा लेक येथे फिरायला गेले असता सकाळी साडेसहा ते संध्याकाळी साडेसहा दरम्यान त्यांच्या पत्नीच्या पर्समधील ५ लाख ९ हजार ५०० रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक रौफ इनामदार करीत आहेत.

# सातारा जिल्हा परिषदेच्या जनसुविधा योजनेच्या ३५ कोटी रुपयांच्या कामाचे भवितव्य अधांतरी : सुरेंद्र गुदगे

## मा. उच्च न्यायालयाची सातारा जिल्हा परिषदेला नोटीस



**मायणी :** सन २०२३-२४ च्या जिल्हा वार्षिक योजनेतून जन सुविधा लेखाशीर्षाखाली सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अंदाजे ३५ कोटीहून जास्त रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. ही मान्यता बेकायदेशीर असून या विरोधात सुरेंद्र गुदगे व खटाव तालुक्यातील काही ग्रामपंचायतीने उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला त्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने जिल्हा परिषद साताऱ्याला नोटीस बजावले असून मान्यता दिलेल्या कामाचे भवितव्य आधांतरी असल्याचे मत माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेंद्र गुदगे यांनी मायणी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीमधून गावोगावच्या विकास कामासाठी ग्रामपंचायतीला निर्णय घेता यावेत म्हणून जन सुविधा लेखाशीर्षाखाली विशेष अनुदान मिळणेबाबत सप्टेंबर २०१० रोजी शासन निर्णय पारित झाला होता. त्या निर्णयानुसार सदर योजनेच्या कामांचा समावेश गाव नियोजन आराखड्यात असणे आवश्यक आहे. त्या योजनेअंतर्गत प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता ग्रामसभेच्या संमती नंतर ग्रामपंचायत देत असे अशी तरतूद आहे सदर योजनेचा आढावा व संबंधित अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी राहतील अशा शासनाच्या मार्गदर्शक सूचना आहेत असे असताना सातारा जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग करत व आपल्या अधिकार कक्षेच्या बाहेर जात चुकीच्या पद्धतीने ३५ कोटीपेक्षा जास्त कामांना प्रशासकीय मंजुरी दिली असून या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा अंदाज ही सुरेंद्र गुदगे यांनी व्यक्त केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराच्या उल्लंघन बाबत तसेच शासनाच्या पारित केलेल्या निर्णयाची पायमल्ली केल्याचे यातून दिसून येत आहे.

सुरेंद्र गुदगे व खटाव मधील काही ग्रामपंचायतीनी याबाबत उच्च न्यायालयात धाव घेतली होती त्यापूर्वी सुरेंद्र गुदगे यांनी १३ मार्च २०२३ रोजी सचिव ग्रामविकास व १५ मार्च २०२४ रोजी सातारा सीईओ यांना याबाबत पत्र दिले होते व या पत्रात सातारा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी चुकीच्या केलेला गोष्टीचा उल्लेख केला होता.

माननीय उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक व न्यायमूर्ती कमळ खाता यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली याचिकाकर्त्यांनी बेकायदा मंजुरी व अनियमितता असल्याचे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे उच्च न्यायालयाने सातारा जिल्हा परिषदेला नोटीस बजावले असून पुढील सुनावणी होईपर्यंत कोणताही निधी वाटप वाटप केल्यास उच्च न्यायालयाच्या पुढील आदेशास अधीन राहून असतील असे निर्देश पारित केले.

**सदर माननीय उच्च न्यायालच्या निर्णयामुळे ग्रामपंचायतीच्या निर्णयावर गंडांतर आणणे जिल्हा परिषदेला महागात पडणार पडणार आहे . त्यामुळे प्रशासकीय काळातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभार चव्हाट्यावर आला असून जिल्हा प्रशासनाने कामकाजात सुधारणा न केल्यास अनेक बेकायदा प्रकरणे आपण चव्हाट्यावर आणू असा इशाराही सुरेंद्र गुदगे यांनी अधिकाऱ्यांना दिला आहे.**

### कुऱ्हा येथील सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता



**पिंपरी चिंचवड :** रिसोड जवळ असलेले कुऱ्हा गावामध्ये दि १0ते १७ पर्यंत हरिनाम सप्ताह श्रीराम मानस चरित्र कथा ही भ प श्रीनिवास महाराज घुगे आळंदी देवाची यांनी सात दिवस कथा प्रतिपादन केले

यामध्ये सात दिवसांत सात हरिकीर्तन झाले ठिकठिकाचे महाराज मंडळी सेवा करण्यात आली.

दि .१७ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह भ प श्रीनिवास महाराज घुगे यांनी काल्याचे किर्तन केले या किर्तनात गुरूमुळे जीवाला ब्रह्माची प्राप्ती होते, असे प्रतिपादन यांनी केले.

।। उपजोनिया पुढती येऊं।। काला खाऊ दहीभात।। वैकुंठ तो ऐसे नाही।। ह भ प श्रीनिवास घुगे महाराजांनी या तुकोबारायांच्या काला रुपी प्रकरणातील अभंग घेऊन काल्याचे महत्व सांगितले. कुऱ्हा येथे अखंड व्हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते. शुक्रवारी (दि.१७) रोजी काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.

सप्ताह काळात गोपाळ गायवाळ दिनकर महाराज जायभाये राधेश्याम खरबळ मारोती दांगट अंजली ताई शिंदे गायत्री ताई माने सोपान महाराज मुंडे यांची कीर्तन सेवा झाली.

## मान्सूनच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पूर आणि दरडप्रवण क्षेत्रात खबरदारीच्या सर्व उपाययोजना तयार ठेवा : जितेंद्र डुडी

**सातारा :** हवामान विभागाकडून सातारा जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आल्यावर पूर प्रवण व दरड प्रवण गावातील नागरिकांना त्यांच्या पशुधनासह तात्काळ हलविण्याची व्यवस्था करावी. नागरिकांच्या निवारा, अन्न, पाणी, विज आदी सोयी सुविधांबरोबर जनावरांसाठी पाण्याची व चाऱ्यांची व्यवस्था करावी. नागरिकांच्या स्थलांतराची जबाबदारी ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील व कोतवाल यांच्याकडे द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात मान्सून पूर्व आढावा बैठक जिल्हाधिकारी श्री. डुडी यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण नाईक, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, वाईचे प्रांताधिकारी राजेंद्रकुमार जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी शशिकांत माळी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी देविदास ताम्हाणे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

भूस्खलन होण्याआधी निसर्गाकडून, पशु पक्षांकडून संकेत मिळातात. त्या संकेतांबाबतची दरड प्रवण गावांमध्ये जनजागृती करावी, असे निर्देश देवून जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, असे संकेत दिसल्यास तात्काळ तेथील नागरिकांना हलविण्यात यावे. पाटण, जावली, महाबळेश्वर व वाई या तालुक्यांवर विशेष लक्ष केंद्रीत करावे. सर्व नगरपरिषदांनी गटारे, नाले संपूर्ण स्वच्छ होतील हे पहावे. तसेच लगतच्या तलावातील गाळ काढण्यावर भर द्यावा.

आरोग्य विभागाने पावसाळ्यात उद्भवणारे साथींच्या रोगांबाबत पुरेसा औषधसाठा उपलब्ध करुन ठेवावा. साथींचा रोगाचा जास्त प्रादुर्भाव होणार नाही याची दक्षता घ्यावी. वैद्यकीय अधिकारी आरोग्य केंद्रात पूर्णवेळ उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे. पाटबंधारे विभागाने नदीपात्रालगतची, नदीपात्रातील अतिक्रमणे हटवावित. धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यापूर्वी नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा द्यावा. कृषी विभागाने प्रत्येक मंडलामध्ये पर्जन्यमापक यंत्र बसल्याची खात्री करावी. ज्या ठिकाणी पर्जन्यमापक यंत्र बसले नाहीत त्या ठिकाणी पर्जन्यमापक प्राधान्याने बसवून घ्यावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केल्या.

पुराचा संभाव्य धोका असणाऱ्या गावांना अन्नधान्याचा पुरेसा साठा उपलब्ध करुन द्यावा. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांवरील खड्डे बुजवून घ्यावे संभाव्य दरडप्रवण ठिकाणी आवश्यक साधन सामग्री उपलब्ध ठेवावी. प्रत्येक विभागाने नोडल ऑफीसरची नियुक्ती करुन अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक, नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांकांची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाला द्यावी. सर्व विभागांनी तालुकास्तरावर मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक घेऊन आपत्ती व्यवस्थापन आराखडा २० मे पर्यंत सादर करावा, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी केल्या.

## महावितरणच्या लोंबकळत असणाऱ्या विद्युत तारेचा शॉक बसल्याने फवारणी करणाऱ्या शेतमजुराचा मृत्यू

**कोरेगाव :** मौजे शिरढोण तालुका कोरेगाव गावच्या हद्दीत लोहार की नावाच्या शेत शिवारात गट नंबर २१७ मध्ये उसामध्ये शेत फवारणी करीत असताना महावितरणच्या पोलवरील लोणकळत असणाऱ्या विद्युत वाहक तारेला शेतमजूर शंकर भाऊ वाघमळे (वय वर्षे ४६ ) याचा स्पर्श होताच जबरदस्त शॉक बसल्याने त्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. त्याला कोरेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात आणले असता मयत घोषित करण्यात आले. याप्रकरणी मताचा चुलत भाऊ दत्तात्रेय वाघमळे यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

गोगावलेवाडी येथील रहिवाशी असणारे शंकर भाऊ वाघमळे यांच्या कुटुंबात वृद्ध आई, पत्नी, व महाविद्यालयीन शिक्षण घेत असणारे एक मुलगी व मुलगा असा परिवार आहे. गोगावलेवाडीसह पंचक्रोशीत बागायती पिकामध्ये रासायनिक खत फवारणी, भांगलनी असा मोलमजुरी करून कुटुंबाचा चरितार्थ चालवीत होते.

शंकर वाघमळे आज सकाळी शिरढोण येथील लोहारकी नावाचा शेत शिवारात शेतकऱ्याच्या ऊस पिकामध्ये औषध फवारणी करीत होते. त्याशिवारात महावितरण कंपनीचे विद्युत पोल कलल्याने विद्युत वाहक तारां अतिशय खाली लोबकळत आहेत. शंकर वाघमळे औषध फवारणी करीत करीत पाठीमागे सरकत असताना त्यांचा लोमकरणाऱ्या विद्युत वाहक तारेला स्पर्श झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

दरम्यान औषध फवारणी सुरू असणाऱ्या शेताचा शेतमालक काही अंतरावर उभा होता, फवारणी करणारे वाघमळे खूप वेळ झाला तरी हालचाल होतं नसल्याचे दिसून आल्याने त्यांनी शोध घेतला असता, त्यांना वाघमळे शोक बसल्याने निपचिप पडल्याचे दिसून आले . त्यांनी तात्काळ शिरढोण गावात जाऊन महावितरण कंपनीच्या वायरमनला घटनेची माहिती दिली. तात्काळ विद्युत पुरवठा बंद करून शंकर वाघमळे यांना कोरेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथे ते मयत असल्याचे सांगण्यात आले. कोरेगाव पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला आहे. तपास हवालदार सचिन साळुंखे करीत आहेत.

**शिरढोण गावातचं नव्हे तर कोरेगाव तालुक्यातील बहुसंख्य गावात विद्युत पोल कलल्याने विद्युत वाहक तारा अक्षरशः हाताच्या अंतरावर आलेल्या आहेत. महावितरण कंपनीच्या भोंगळ कारभारामुळे वर्षभर घाम गाळून उभा केलेल्या उसाचे पीक जळून जाऊन लाखो रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान होत असते तर भविष्यकाळात पानमळे, उसाचे शेती असो कि अन्य बागायती शेत पिकात अशा घटना वारंवार घडत राहणार आहेत, मात्र हातावर पोट असणाऱ्या शेतमजूर शंकर वाघमळे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने त्यांची वृद्ध आई, पत्नी, महाविद्यालयीन शिक्षण घेत असणारे मुलगी व मुलगा यांचा संसार मात्र उघड्यावर पडल्याचे दिसून येते.**

## श्रीमंत महादजी शिंदे शेतकरी संस्था महाराष्ट्र राज्य यांची मागणी शासन प्रशासनाकडून मान्य

**कोरेगाव :** सातारा जिल्ह्यातील ९५३ विकास सेवा सोसायटीतील शेतकरी वर्गाची छुपी सावकारी, बोगस कर्ज प्रकरणे, मयत कर्ज प्रकरणे इत्यादी प्रकारची फसवणूक थांबुन आर्थिक पारदर्शकता राखण्यासाठी प्रत्येक विकास सेवा सोसायटीमध्ये उउढत यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत श्रीमंत महादजी शिंदे शेतकरी संस्था, महाराष्ट्र राज्य यांचा शासन व सहकार प्रशासन यांच्याकडील पाठपुराव्याला यश आले आहे.

सातारा जिल्ह्यातील ९५३ विकास सेव सोसायटीचे सभासद हे तेथील शेतकरी असून त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, तेथील कर्मचारी सचिव खूप मोठया प्रमाणात सावकारी, शेतकऱ्यांची फसवणूक करून शेतकऱ्यांची लूट करीत आहेत. जिल्ह्यातील सहकारी यंत्रणा ही जाणीवपूर्वक ह्या सर्व प्रकाराकडे कानाडोळा करत असून जिल्ह्यातील जिल्हा बँक प्रशासन व सर्व सहकारी व्यवस्थेतील अधिकारी यांच्या अघोषित समझोत्यावर हे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. जिल्ह्यातील ९५० हून अधिक सोसायटीमधून कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल होते, पण त्या व्यवहारांची सुरक्षितता, पारदर्शता वाढावी यासाठी उउढत यंत्रणा बसवणे बंधनकारक करावे अशी विनंती, श्रीमंत महादजी शिंदे शेतकरी संस्थेचे, संस्थापक अध्यक्ष श्री. किशोर शिंदे यांनी विविध ई-मेलद्वारे शासनाला केलेली होती

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी विषयांकित प्रकरणी त्यांचे स्तरावरुन उचित कार्यवाही करून अर्जदारास समर्पक उत्तर देणे व आवश्यक त्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करणेच्या सूचना महाराष्ट्र शासन सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, यांनी दिनांक ०२ मे, २०२३ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांना केल्या. उपरोक्त पत्रात सातारा जिल्ह्यातील ९५३ विकास सेवा सोसायटीतील शेतकरी वर्गाची छुपी सावकारी, बोगस कर्ज प्रकरणे, मयत कर्ज प्रकरणे याबाबत होत असलेल्या फसवणुकीच्या अनुषंगाने तक्रार करण्यात आली असून सोसायटीच्या व्यवहारामध्ये आर्थिक पारदर्शकता राखण्यासाठी आपल्या स्तरावरुन उचित कार्यवाही करण्यात यावी व श्री. किशोर शिंदे यांना आपले स्तरावरुन समर्पक उत्तर द्यावे. तसेच त्यांनी केलेल्या तक्रार/विनंतीच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या संपूर्ण कार्यवाहीचा स्वयंस्पष्ट, वस्तुस्थितीदर्शक व अचूक कारवाईसूचक अहवाल आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह या कार्यालयास तात्काळ सादर करावा असे स्पष्ट निर्देश देण्यात आले.

सहकार आयुक्त कार्यालयाने सातारा जिल्हा उपनिबंधक यांना ३ एप्रिल २०२४ रोजी कारवाई व अहवालाची स्पष्ट मागणी केली. त्यानुसार सातारा जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने, जिल्ह्यातील सर्व ११ तालुका सहायक निबंधक यांना दिलेल्या निर्देश अहवाल व सर्व तालुका सहायक निबंधक यांनी तालुका पातळीवर सर्व विकास सेवा सोसायटीना दिलेल्या निर्देशातून संपूर्ण सातारा जिल्ह्यातील विकास सेवा सोसायटीत उउढत बसवण्याच्या अंमलबजावणीचा अहवाल १० मे २०२४ ला सहकार आयुक्त, शासनाला सादर केला आहे.

### चांदीची लाखाकडे वाटचाल, भाव जीएसटीसह ९३,४२१ !


**नागपूर :** चांदीची एक लाख रुपयांकडे वाटचाल सुरू असून मे महिन्यात केवळ १८ दिवसांत ३ टक्के जीएसटीएसह शुद्ध चांदीचे प्रतिकिलो भाव ९,३७३ रुपयांची वाढून ९३,४२१ रुपयांवर पोहोचले आहेत. हे दर सातत्याने वाढत आहेत. वाढत्या दरानंतरही ग्राहकांची खरेदीही वाढतच असल्याचे सराफांचे मत आहे.

महागाईचा वाढता दबाव आणि सर्वच औद्योगिक क्षेत्रात मागणी वाढल्यामुळे चांदीच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. नवीन वर्षांत औद्योगिक क्षेत्रात चांदीचा उपयोग मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. परिणामी चांदीच्या भावात हळूहळू वाढ होऊ लागली. मे महिन्याच्या दरवाढीचा आढावा घेतल्यास १ मे रोजी चांदीचे भाव जीएसटीविना ८१,९०० रुपयांवर स्थिर होते. ४ मेपर्यंत ८०,६०० रुपयांपर्यंत कमी झाले. त्यानंतर ६ मे रोजी ८२,३०० रुपयांवर गेले. ८ मेपर्यंत भाव ८२,५०० रुपयांवर स्थिर होते. मात्र ९ मे रोजी ८०० रुपयांनी वाढून ८३,३०० रुपयांवर पोहोचले. १० मे रोजी तब्बल २ हजार रुपयांची वाढ होऊन भाव ८५,३०० रुपयांवर पोहोचले. त्यानंतर ११, १२, १३ आणि १४ मे रोजी भाव ८५ हजारांखाली अर्थात ८४,९०० पर्यंत कमी झाले. १५ मे रोजी ४०० रुपयांनी वाढून ८५,३०० रुपयांवर गेले. १६ मे रोजी चांदीत १,५०० रुपयांची वाढ झाली.

## छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त समाधी स्थळाला अभिवादन

**सातारा :** पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात सातारा शहरात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपतींची गादी निर्माण केली . साताऱ्यात राज्य चालवलेले होते . त्या छत्रपती थोरले शाहू महाराज यांच्या २७५ व्या जयंतीनिमित्त आज अनेक मावळ्यांनी सातारा नजीक क्षेत्र माहुली येथील कृष्णा कोयनेच्या संगमा नजीक त्यांच्या पवित्र समाधी स्थळाला भेट देऊन अभिवादन केले. अनेक मान्यवरांनी इतिहासात घडलेल्या छत्रपती थोरले शाहू महाराज यांच्या कारकिर्दीची माहिती नव पिढीला दिली.

कृष्णा कोयनेचा संगम असलेल्या सातारा नजीकच्या नदीपात्रातील सीसंम लाकडावर उभे असलेल्या या समाधीच्या नऊ फूट खोल पाया खोदून हा दगडाचा चौथारा समाधी उभारण्यात आलेली आहे. या समाधी वर नदीपात्रात सापडलेली मूळ पिंड असून या ठिकाणी अनेक मावळे व इतिहास प्रेमी भेट देत आहेत. थोरले शाहू महाराज यांचा १८ मे १६८२ साली गांगवली तालुका माणगाव जिल्हा रायगड या ठिकाणी जन्म झाला होता. जन्मापासूनच मोगल बादशाह व औरंगजेबाच्या कब्जात ते होते. त्याबद्दल त्यांचे सुटका



**श्री क्षेत्र माहुली येथील कृष्णा कोयनेच्या संगम संगमावर थोरले शाहू महाराजांच्या समाधी स्थळे अभिवादन करताना मान्यवर (छाया-निनाद जगताप, सातारा**

झाल्यानंतर त्यांनी १७0७ ते १५१ डिसेंबर १७४९ पर्यंत सलग ४२ वर्ष त्यांनी अखंड हिंदुस्थानावर अटकेपार झेंडा रोवला होता. साताऱ्यात हिंदवी स्वराज्याचे राज्य निर्माण केले होते. मराठा साम्राज्य पंतप्रधान पेशवे यांना याच गादी कडून कारभाराची वस्त्र प्रदान करण्यात येत होती. अशी इतिहासामध्ये नोंद आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त साताऱ्यातील इतिहास प्रेमी व अभ्यासक व चित्रपट निर्माते शशिकांत पवार, धीरेंद्र राजपुरोहित, अजय जाधवराव, प्रशांत कुलकर्णी, पत्रकार विशाल कदम ,अजित जगताप व मान्यवरांनी दक्षिण काशी संबोधणाऱ्या तीर्थक्षेत्र माहुली या ठिकाणी नदीपात्रात असलेल्या थोरले शाहू महाराज यांच्या समाधी स्थळी जाऊन पुष्प अर्पण केले. तसेच त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. सातारा नगरीची निर्मिती करणारे छत्रपती थोरले शाहू महाराज यांची जयंती भव्य दिव्य व्हावी.

यासाठी सर्वसाधारण सातारकर बंधू-भगिनी व मावळ्यांनी मनापासून प्रयत्न करावा. खरं म्हणजे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी गुरु मानलेले श्री कचेश्वर स्वामी महाराज ब्रह्म राजगुरू यांचे सुद्धा या ठिकाणी समाधी असून दोन्ही गुरु व शिष्य हे सध्या नदीकाठावरच आहेत. परंतु, त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा. यासाठी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा व्हावा. अशी अपेक्षा अनेक साताऱ्यातील इतिहास प्रेमींनी केली आहे.

## वाठार (किरोली) येथे डेंग्यू दिन साजरा

### घरोघरी सर्वे करून आठवड्यातील एक दिवस कोरडा दिन पाळण्याचे आवाहन

**कोरेगाव :** वाठार (किरोली) ता. कोरेगाव येथे डेंग्यू दिनानिमित्त रॅली काढून गावात घरोघरी सर्वेक्षण करून नागरिकांना डेंग्यू विषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सर्वेक्षण पथकाने ग्रामस्थांना साथ रोग आटोक्यात आणण्यासाठी सर्वांनी आठवड्यातील एक दिवस कोरडा दिन पाळण्याचे आवाहन केले.




वाठार किरोली तालुका कोरेगाव येथे आज १६ मे २०२४ रोजी डेंग्यू दिनानिमित्त रॅली काढून गावामध्ये प्राथमिक आरोग्य स्तरावर घरोघरी भेटी देऊन डेंग्यू सर्वेक्षण करून नागरिकांना डेंग्यू आजाराविषयी मार्गदर्शन प्राथमिक आरोग्य केंद्र वाठार किरोली अंतर्गत गावात साथीच्या रोगाने वाढणारी रुग्ण संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी हिवताप विभागाच्या उद्धव राऊत यांनी डेंगूदिना निमित्त केलेल्या नियोजनानुसार घरोघरी जनजागृती करण्यात आली.

वाढता उन्हाळा असल्याने कंटेनरमध्ये साठवलेले पाणी दूषित होत असल्यामुळे साथीचे रोग फैलावत असल्याचे माहिती दिली व आठवड्यातील एक दिवस नागरिकांनी कोरडा दिन पाळण्याचे आवाहन केले. घरोघरी साठवलेल्या पाण्याच्या कंटेनरचा सर्वे दरम्यान ज्या ठिकाणी पाण्याचा नमुना पॉझिटिव्ह आला, त्या ठिकाणचे कंटेनर रिकामी करण्यात आले, व ज्या ठिकाणी कंटेनर रिकामा करता येत नाही, अशा ठिकाणी अबेट टाकून निर्जंतूणीकरण करण्यात आले.

यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. अशिफ जमादार, डॉ. समशेर मोरे पाटील, डॉ. श्रीमती शितल मायणे, यांच्या उपस्थितीत सुरू झालेल्या सर्वेक्षण मोहिमेत उद्धव राऊत, समुदाय आरोग्य अधिकारी श्रीमती पल्लवी देशमुख, आरोग्य सहाय्यक संतोष गायकवाड, अधिकराव कुंभार, श्रीमती अलका सलाम दोन्ही गटप्रवर्तक व आरोग्य सेवक, पुरुष, स्त्री यांनी सर्वे केला.

## महिला सरपंचांना सी.एस.आर. फंडाची होणार मदत

**सातारा :** ग्रामपंचायतीला विकास कामे करण्यासाठी ग्राम निधी, वित्त आयोगाचा निधी अपुरा पडतो. जिल्ह्यातील महिला सरपंचांना याबाबत प्रोत्साहन देण्यासाठी नाम फाऊंडेशन, दीपस्तंभ फाऊंडेशन,परांजपे ग्रुप लोकसहभागातून विकास कामास सीएसआर फंडातून शक्य ती मदत करु शकतात.यासाठी शुक्रवार दि.१७ में रोजी दु.१२ वाजता वर्ये येथील पंचायत राज प्रशिक्षण केंद्राच्या सभागृहात बैठक होणार असून जिल्ह्यातील महिला सरपंचांनी यावेळी उपस्थित रहावे ,असे आवाहन पंचायत राज प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजय जाधव यांनी केले आहे.

या बैठकीला रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख, नाम फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश थोरात, दीपस्तंभ फाऊंडेशनचे अध्यक्ष अमेय जोशी, सरपंच परिषदेचे अध्यक्ष जितेंद्र भोसले, नाम फाऊंडेशन पश्चिम महाराष्ट्र समन्वयक बाळासाहेब शिंदे, परांजपे ग्रुपचे शिरीष पवार, केबीपी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ.बी. एस.सावंत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सातारा जिल्ह्यातील महिला सरपंचांना गावात जलसंधारण, शिक्षण,ग्राम विकास याबाबत लोक सहभागातून होणाऱ्या कामांना सीएसआर फंडातून प्रोत्साहन म्हणून मदतीसाठी हि बैठक आयोजित करण्यात आली आहे. यात गावातील सीएसआर फंडातून कोणती कामे करता येतील, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, प्रस्ताव कसा करावा, लोकसहभाग कसा अपेक्षित आहे, कामे कशी करावी लागणार आदी माहिती मान्यवर देऊन शंका निरसन करणार आहेत.

जिल्ह्यातील प्रथमच रयत शिक्षण संस्थेचे वर्ये येथील पंचायत राज प्रशिक्षण केंद्राने पुढाकार घेऊन हा स्तुत्य उपक्रम आयोजित केला आहे. यामुळे लोकसहभागातून विकास कामे करण्यासाठी आता सीएसआर फंडाची मदत होणार आहे.